सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार/ग्रामुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-३/३८ ठ. क्र. ६८
दि. २८/४/१६ रोजी ठेवता आलेल्या प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला

तात-३/३८

सोलापूर शहरात ८० हजार विडी कामगारांना रोजगार देणारे विडी कारखाने दि. १-४-२०१६ रोजी पासून बंद ठेवण्यात आले आहेत. मागील २० दिवसापासून रोजगार मिळणे बंद झाल्याने विडी कामगारांमध्ये भयावह वातावरण निर्माण झाले आहे. विडी कामगारांना रोजगार मिळणेसाठी नेहमीप्रमाणे विडी कारखाने त्वरीत सुरु करण्यात यावीत असे आवाहन ही सभा करीत आहे व शासनानी यांची गंभीर दखल घेऊन विडी कारखाने सुरु करण्याबाबतचे आदेश द्यावेत अशी विनंती करणेस,मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सोलापूरातील विडी कामगांराचे रोजगार यापुढेही कायम राहील यादृष्टीने योग्य तोडगा काढण्यासाठी विडी कारखानदार मालकांशी मा.केंद्र शासनाने चर्चा अथवा वाटाघाटी करुन जेणेकरुन कामगांराना रोजगार कायम राहील यादृष्टीने मा.केंद्र शासनास ही सभा विनंती करीत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकुब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३५ ठ. क्र. ५७
दि. १८/५/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-४/३९

सोलापूरच्या पूर्व भागातील अक्कलकोट रस्त्यावरील हिंदू स्मशानभूमीमध्ये शिवधाम या नावाने ओळखल्या जाणा-या कॉमन स्मशानभूमीमध्ये अंत्यविधीसाठी लोकांना मोठया प्रमाणात खर्च येत असतो. सध्या धकाधकीच्या काळात अशा दु:खद प्रसंगी आर्थिकदृष्टया ओढाताण निर्माण होत असते. अशा प्रसंगी त्यांना सदरचा विधी हा मोफत दिल्यास एक प्रकारची सेवा मिळून त्यांच्या दु:खातील अडसर दूर होण्यास मदत होणार आहे. याठिकाणी अग्निसंस्कार करताना येणारा खर्च टाळण्यासाठी रोटरी क्लब, सोलापूर यांच्या वतीने मयताचा अग्निसंस्कार करण्यासाठी अद्ययावत अशी विद्युत दाहिनी व ऑपरेटर स्वखर्चाने उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. ही बाब अतिशय कौतुकास पात्र आहे. तरी सदर स्मशानभूमीमध्ये रोटरी क्लब, सोलापूर यांच्या वतीने विद्युत दाहिनी बसविणेस सदर विद्युत दाहिनी चालविणेसाठी मोफत ऑपरेटर बसविणेस तसेच याकामी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने योग्य ती सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेस ही सभा धोरणात्मक मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज....२५....ठ. क्र....७६
दि..१८/५/१६......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहराचे लाडके सुपुत्र,देशाचे माजी गृहमंत्री,माजी मुख्यमंत्री,माजी राज्यपाल,कॉंग्रेस पक्षाचे नेते मा.श्री.सुशिलकुमारजी शिंदेसाहेब यांचा अमृतमहोत्सव वर्ष साजरा करण्यात येत आहे.मा.शिंदे साहेबांची सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासाकरीता खुप मोठे योगदान दिलेले आहे.सोलापूर शहरातील पाणी प्रश्न,रस्ते, ड्रेनेज,नवीन बसेस, एन.टी.पी.सी.सिव्हील हॉस्पिटल, विमानतळ,पॉवर ग्रेड,चौपदरी रस्ता असे अनेक कामे केली आहेत.सोलापूर शहरातील तमाम जनतेने मा.शिंदे साहेबांना आशिर्वाद दिलेला आहे.ज्या श्री.सिध्दरामेश्वरांच्या पुण्यभुमित मा.शिंदे साहेबांचा जन्म झाला हया भुमिमध्ये सोलापूर शहरातील तमाम जनतेच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेमार्फत त्यांना मानपत्र देवून सत्कार करणेकामी देशाचे राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी व माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग,माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणी,अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्षा मा.श्रीमती सोनिया गांधी आणि देशाचे माजी कृषीमंत्री,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा.श्री.शरदचंद्र पवार साहेब, यांना निमंत्रीत करुन सत्कार सोहळा करण्यांत यावा व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच याच कार्यक्रमात १)मा.नामदार नितीन गडकरी-केंद्रीय मंत्री,रस्ते वाहतुक,महामार्ग,जहाजबांधणी (२)मा.देवेंद्र फडणवीस-मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, (३) मा.नाम.विजयकुमार देशमुख-पालकमंत्री,सोलापूर जिल्हा, (४)मा.विजयसिंह मोहिते पाटील-खासदार-माढा लोकसभा(५) मा.शरद बनसोडे-खासदार सोलापूर, (६) मा.प्रणितीताई शिंदे-आमदार शहर मध्य, (७) मा.सुभाष देशमुख-आमदार दक्षिण सोलापूर.यांचाही यथोचित सत्कार करणेस व याकामी येणा-या,खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर सत्कार नियोजनबध्द होणेच्या दृष्टीने खालील मान्यवरांची समिती गठित करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) मा.महापौर,
२) मा.उपमहापौर,
३) मा.सभागृहनेते **- कन्वेनर**
४) मा.अध्यक्ष स्थायी समिती,
५) मा.अध्यक्ष परिवहन समिती
६) मा.विरोधी पक्षनेता,
७) मा.गटनेता शिवसेना,
८) मा.गटनेता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,
९) मा.गटनेता बसपा व माकपा
१०) मा.ॲड.यु.एन.बेरिया
११) मा.मनोहर सपाटे
१२) मा.महेश कोठे
१३) मा.अशोक निंबर्गी
१४) मा.चेतन नरोटे
१५) मा.दिलीप कोल्हे
१६) मा.अनिल पल्ली
१७) मा.इंदिरा कुडक्याल

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.अ. 2 ठ. क्र. ८८ दि. २८/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २१ एकतानगर व विणकर वसाहत येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन घालणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम प्रस्तावासोबत जोडलेल्या पूर्वगणनपत्रकाप्रमाणे २०० मि.मि. (८ इंची) डी.आय.के. ७ पाईप लाईन घालणेकरिता येणारा खर्च र.रु. १३,०३,८६५/- इतकेचे काम मक्तेदार श्री. एस. आर. सोनी यांचेकडून एस्टीमेट दराने मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ मधील कलम ६७ (३) (क) नुसार करुन घेणेत आलेले असून, सदर बाबत केलेली कार्यवाहीची माहिती माहितीस्तव प्रकरण मुदतीत मा. स्थायी समितीमार्फत मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १९-११-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ६९४, दि. २९-२-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

रक्कम रु.१००/- स्टॅम्पवर करण्यात आलेले करारपत्र अर्धवट स्वरुपात आहे. त्यामुळे कायदेशीर करारपत्र करुन प्रकरण फेर सादर करण्यात यावे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज....3....ठ. क्र....85
दि...१८/5/१६ राजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २६ होम मैदान येथे तातडीने यात्रेच्या अनुषंगाने विविध कामे करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव याकामी र.रुपये ६,०१,३००/- इतकेचे पूर्वगणनपत्रक तयार करणेत आले असून, सदरचे काम मक्तेदार श्रध्दा कन्स्ट्रक्शन यांचेकडून एस्टीमेट दराने करुन घेणेस व तसेच श्री. सिध्देश्वर महायात्रा सन २०१६ होम मैदान येथे तात्पुरत्या स्वरुपात दहा शौचालय बांधणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर ठिकाणी पुरुषांकरिता पाच व महिलांकरिता पाच असे एकूण दहा नग पत्र्याचे संडास कामाच्या तातडीची नितांत गरज पाहून सदरचे र.रु. १.०० लाख इतक्या रक्कमेचे जादा काम याप्रमाणे सदरचे दोनही कामे मक्तेदार श्रध्दा कन्स्ट्रक्शन यांचेकडून तातडीने मुं.प्रां.महा. अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये करुन घेणेत आलेले असून, सदरची बाब मा. स्थायी समिती व मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी तसेच सदरकामी जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील करणेसही मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकामी आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत असून, सदरची बाब मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ७७३, दि. २२-३-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

रक्कम रु.१००/- स्टॅम्पवर करण्यात आलेले करारपत्र अर्धवट स्वरुपात आहे. त्यामुळे कायदेशीर करारपत्र करुन प्रकरण फेर सादर करण्यात यावे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४ ठ. क्र. ७९ दि. १९/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



राहूल गांधी झोपडपट्टी येथे ठिकठिकाणी नविन ९ इंची ड्रेनेज लाईन घालणेचे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम तातडीने करुन घेणे आवश्यक असल्याने व तातडीची नितांत गरज पाहून सदरचे पूर्वगणनपत्रक रुपये १२,४३,६०७/- इतक्या रक्कमेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका कलम ६७ (३) (क) अन्वये मक्तेदार श्रध्दा कन्स्ट्रक्शन यांचेकडून १ % कमी दराने करुन घेणेस व त्यांना जा.क्र./विकाक्र ७/५३८, दि. १-३-१६ ने दिलेली वर्कऑर्डर मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेस तसेच जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २९-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेकामी आलेल्या प्रकरणाचे अवलोकन होऊन प्रकरणी मा. आयुक्त यांचे दि. २९-२-१६ चे टिपणीप्रमाणे जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील करणेस मान्यता देणेत येत असून, सदरची बाब मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ७७४, दि. २२-३-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

रक्कम रु.१००/- स्टॅम्पवर करण्यात आलेले करारपत्र अर्धवट स्वरुपात आहे. त्यामुळे कायदेशीर करारपत्र करुन प्रकरण फेर सादर करण्यात यावे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ..५.....ठ. क्र..[illegible]
दि..१८/५/१६.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



१० मेट्रीक टन स्टेबल ब्लिचिंग पावडर गेड-१ खरेदी करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरची खरेदी पाणी पुरवठयाशी निगडीत असल्याने, तातडीची बाब विचारात घेऊन मागील सन २०१४-१५ चे सर्वात कमी दर असलेले केमीकल पिपल यांचे दर प्रति मेट्रीक टनास रुपये २३,९००/- याप्रमाणे १० मे. टन ब्लिचिंग पावडर गेड-१ खरेदी करण्यास व त्याकरिता येणारे रुपये २,३९,१००/- इतक्या खर्चास व सदरची खरेदी ही पाणी पुरवठयाशी निगडीत असल्याने सदर खरेदी अत्यंत तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकरणी मुंबई प्रांतिक अधिनियम ६७ (३) (क) अंतर्गत असलेल्या अधिकाराअंतर्गत खरेदी करणेत आलेली असून, केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अहवाल मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ८-१-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेस मा. स्थायी समिती ठराव क्र. ७७६, दि. २२-३-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

रक्कम रु.१००/- स्टॅम्पवर करण्यात आलेले करारपत्र अर्धवट स्वरुपात आहे. त्यामुळे कायदेशीर करारपत्र करुन प्रकरण फेर सादर करण्यात यावे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...६......ठ. क्र.....८७
दि...१८/५/१६...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
एकमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सिध्देश्वर महायात्रा सन २०१६ अन्वये होम मैदान येथील होमकट्टया भोवती लाईटची व्यवस्था करणेकरिता अंडरग्राऊंड केबल टाकणे अत्यंत आवश्यक व गरजेचे असलेने सदरचे कामाची तातडीची नितांत गरज पाहता सदरचे काम मक्तेदार समर्थ एंटरप्रायझेस यांचेकडून एस्टीमेट दराने (पूर्वगणनपत्रक क्र. र.रुपये ९९,८९८/-) मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये करुन घेणेत आलेले असून, सदर बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. १५ दि. २-४-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

रक्कम रु.१००/- स्टॅम्पवर करण्यात आलेले करारपत्र अर्धवट स्वरुपात आहे. त्यामुळे कायदेशीर करारपत्र करुन प्रकरण फेर सादर करण्यात यावे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकच्या तहकूब/सामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज....५.....ठ. क्र....६२... दि....१८/५/१६....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



कुंभारवेस शॉपिंग सेंटरवरील पहिल्या मजल्यावरील सामाजिक सभागृहाची जागा भाडयाने देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. ६९२, दि. २६-२-१६ अन्वये श्री. सिध्देश्वर नित्य अन्नदानछत्रम, श्रीशैल उत्तर कसबा या संस्थेस कुंभारवेस शॉपिंग सेंटर येथील पहिल्या मजल्यावर बांधण्यात आलेले सामाजिक सभागृह व समोरील खुली जागा संस्थेचे विविध उपक्रम राबविणेकामी यु.सी.डी.च्या नियमाप्रमाणे सदर संस्थेस भाडे आकारुन २९ वर्षे कराराने देणेस मान्यता देणेत आलेली असून, सदर मा. स्थायी समितीचे ठरावाचे अनुषंगाने व मा. सहा. संचालक नगर रचना यांचेकडील अभिप्रायानुसार जागेचे भाडेमुल्य व जागेची किंमत प्रस्तावात नमूद असून, सदरचे हॉलचे प्रति माह भाडे र.रु. ३३,५४०/- (तेहत्तीस हजार पाचशे चाळीस रुपये फक्त) व जागेची किंमत र.रु. २,९८,३१६/- (दोन लाख अठ्ठयाणव हजार तीनशे सोळा रुपये फक्त) इतके होत आहे. तरी विषयांकित ठिकाणचे जागेचे मुल्य हे निश्चितपणे र.रु. ५०,०००/- पेक्षा होणार आहे. यास्तव अर्जदार संस्थेस हॉलची जागा प्रस्तावात नमूद भाडेदराप्रमाणे देणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण क्र. ७ मधील कलम ७९ नुसार धोरणात्मक निर्णयास्तव मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले. मा.आयुक्त यांचे दि.३१-३-२०१६ चे टिपणीत नमूद अर्जदार संस्थेस हॉलची जागा २९ वर्ष कराराने देणेस व याकामी दरमहा भाडे रक्कम रु.१५००/- आकारणी करणेस धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासूली/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज...८.....ठ. क्र....६३
दि...१८।५।१६...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सी.आर.पी.सी. १९७ प्रमाणे दोषारोप पाठविणेस परवानगी मिळणेबाबत आरोपी श्रीमती सुनंदा गोरख सुतार कायम मजूर यांचेविरुध्द प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दाखल गुन्हयामध्ये मे. न्यायालयात दोषारोप पाठविणेस मंजूरी देणेत आलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९-अ नुसार सदरची बाब मा.आयुक्त अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजूरीची माहिती नगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महापालिकेला कळवील अशी तरतूद आहे. तरी सदरची बाब मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत मा. आयुक्त यांचे दि. ३०-११-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २९२, दि. १७-२-१६ अन्वये संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करण्यांस मान्यता देणेत येत आहे. असा ठराव पारित झालेला असून, त्यास अनुसरुन प्रस्तावासोबत सविस्तर माहिती सादर केली असून, सदरची बाब मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्याबाबत सविस्तर मा. आयुक्त यांचे दि. ३१-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

संबंधित सेवकास कामावर घेऊन चौकशी करण्यांत यावी.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज...६....ठ. क्र....८४.. दि..२८/५/१६.... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील दाराशा दवाखाना येथे २ रुम व नुतनीकरण करणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. ८/सन २०१५-१६ र.रु. ३८,५६,४३२/- यांस मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २६७, दि. ८-३-१६ रोजी मान्यता देणेत आलेली असून, प्रस्तावित केलेप्रमाणे प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देण्यांत येत आहे.

सदरची रक्कम सन २०१६-१७ चे भांडवली कामातून देण्यांत यावे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

कोल्हापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे ... १० ठ क्र. ८५
दि. १८/५/१६ ... या ठराव
...



प्र.क्र. ८ मध्ये वीरकर गणपती येथे चेनलिंक फेन्सींग करणे, तांडूर फरशी करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक र.रु. १०,७८,०९२/- चे तयार करणेत आले असून सदर पूर्वगणनपत्रकानुसार र.रु. १०.८० लाख इतकी रक्कम उपलब्ध होवून मिळणेस तसेच खाजगी जागेत काम करणेस धोरणात्मक निर्णय होणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.खाजगी जागेत काम करणेस,धोरणात्मक मान्यता देण्यांत येत आहे.

सदर कामासाठी मा.सदस्यांच्या भांडवली निधीतून रक्कम देण्यांत यावी.

नगरसचिव
कोल्हापूर महानगरपालिका